आहे? किंवा एखादे पात्र कोणत्या वातावरणातून आले आहे? यावरही त्याची भाषा अवलंबून असते. उदा. एखादा उत्तर भारतीय माणूस मुंबईत अशुद्ध मराठीही बोलणार नाही. अशावेळी कथानकाला अनुकूल अशी भाषा वापरताना त्यातील दाखविलेल्या पार्श्वभूमीनुसार चालीरीती, लकबी, म्हणी, वाक्प्रचार योजावे लागतात. महेश एलकुंचवार यांच्या 'वाडा चिरेबंदी' या नाटकात खास नागपुरी थाटाची मराठी भाषा वापरली आहे ती आपण पुढे पाहणारच आहोत. व्यक्तिगत लकबीखेरीज समूहातील सांस्कृतिक, भौगोलिक, वांशिक पार्श्वभूमीच्या काही वैशिष्ट्यांचाही व्यक्ती जीवनात आढळ होतो.

**बीजशब्द –**

नाटक, संवाद

नाटकातील संवादाच्या स्वरूपाचा विचार महेश एलकुंचवार यांच्या 'वाडा चिरेबंदी' व 'आत्मकथा' प्रातिनिधिक स्वरूपात या दोन नाटकांच्या आधारे करणार आहोत.

**वाडा चिरेबंदी**

महेश एलकुंचवारांनी हे नाटक १९८७ वर्षी लिहिले. या नाटकामध्ये काळ बदलल्यावर व वैभव नष्ट झाल्यावरही केवळ नावलौकिक टिकविण्यासाठी, ऋण काढून सण साजरा करण्यासाठी धडपडणाऱ्या कुटुंबाचे प्रतिनिधित्व करणारे हे नाटक आहे. धरणगावकर देशपांडयांच्या मुळात चिरेबंदी असलेल्या पण सध्या विपन्नावस्थेतील वाड्यात ही धडपड चालू आहे. तात्याजी देशपांडे यांच्या मृत्यूने त्यावर आणखी अवकळा पसरली आहे. सर्व मुलांना एका मायेच्या छत्राखाली आणणारा दुवा नाहीसा झाल्याने सर्वांच्या मनात एक प्रकारचा स्वार्थ व दुराव्याची भावना बळावली आहे. परंतु आतापर्यंतच्या सहवासातून निर्माण झालेल्या प्रेमामुळे त्यांना हे पाश एकदम तोडून टाकणे जमत नाही. वाड्यातील माणसांचे हे भावविश्व नाटकातील पात्रांच्या परस्पर संबंधातून उलगडत जाते.

कुटुंबप्रमुख तात्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या श्राद्धाला गाव जेवण घातले पाहिजे, ही जुनी प्रथा चालू ठेवण्याचा आईचा आग्रह, परंतु हा खर्च कुणी



करायचा याविषयी भावंडांनी आपसात केलेली चालढकल, एकत्र कुटुंब पद्धतीत होत चाललेल्या बदलाचे चित्र व त्यातून माणसाचा स्वार्थीपणा, हिशोबीपणा, अंग काढून घेण्याची वृत्ती, मनाच्या तळाशी लपून बसलेली माया या सर्वांचे दर्शन नव्हे एकूण पडझडीचे चित्र एलकुंचवारांनी सूक्ष्मपणे केले आहे. नाटकाच्या प्रारंभीच पूर्वीच्या वैभवाची साक्ष देणारे 'बुलडोझर' व 'मेणा' आणि सध्याची ढासळलेली आर्थिक परिस्थिती दर्शविणारे वाडा पोखरणारे उंदीर, मृत झालेल्या मुलाच्या नावाने हाक मारणारी व जणूकाही काळाची जाणीव करून देणारी दादी, बदलती परिस्थिती व आलेल्या संकटांचा शांतपणे विचार करून ढासळणारे घर टिकवू पाहणारी आई, या आधारावर नाटकामध्ये नाटककार उत्कृष्ट अशी वातावरण निर्मिती केली आहे.

मृत्यूनंतरचा सुतकातील काळ, वाड्याची दशा यामुळे वातावरणावर काळी छाया पसरलेली आहे. त्याचबरोबर कुटुंबियांच्या संवादातून भावनेचा ओलावाही जाणवतो.

**संवादाचे स्वरूप–**

तात्याजींच्या मृत्यूपासून तो त्यांच्या श्राद्धापर्यंतचा काळ या नाटकामध्ये एलकुंचवारांना चित्रित करावयाचा असल्याने कथानक सांगण्याचे काम मुख्यत्वे संवादाद्वारे साधावयाचे व त्याबरोबरच देशपांडयांचा नावलौकिक जपतांना त्या वाड्यात गुदमरणाऱ्या व्यक्तींचे दर्शन घडवावयाचे आहे. आई आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र नसूनही, नावलौकिक टिकावा, सर्व मुलांनी मनाने जवळ असावे यासाठी धडपडते. तिच्यामध्ये मी व माझे ही भावना नाही. आई व प्रभा यांच्यातील खालील संवाद प्रभावी आहे. त्यातून तात्याजींच्या हयातीतील परिस्थिती व आईने जमीन विकल्यावर, ती–प्रभा–चंदू यांना जगावे लागणारे भविष्यकालीन परावलंबी जीवन यांचं स्पष्ट चित्र या संवादातून शब्दचित्रीत केलं आहे. आई– तसं म्हण माय. पण मज एक सांग. पोरांना दुखवून मी कुठे जाणार होती? काय चाललं आहे, काय नाही मज कळत नाही असं वाटतं का तुज? पण हे होते तरी ची गोष्ट वेगळी होती. (विराम) प्रभा, तुजही एक गोष्ट सांगते. डोक्यात राख काही घालून घेऊ नको. माझी सद्दी संपली. आता राज्य भावजयींच

Science College 160 KURHA

आहे. ओळखून वाग. तू उद्या म्हणशील, मध्ये पड, तर मी काही पडणार नाही मध्ये. अखेर त्याच करणाऱ्या आहेत. दिवस मज त्यांच्याजवळ काढावं लागणार आहे. किती तडंतडं बोलते तू तरी. बरं नाही ग.

प्रभा– एकजात स्वार्थी आहेत सगळे...

आई– स्वार्थ कोणाला सुटला आहे, प्रभा? इच्छा असो–नसो... प्रपंच मांडला की माणूस आपोआपच स्वार्थी होतो.

प्रभा– तुझा जीव सुना मुलांकडे धावणार...

आई– स्वार्थ म्हण, काही म्हण प्रभा. मज काही त्यांना दुखवून चालणार नाही हो!

प्रभा– (घायाळ)आई, मला शिकायचं आहे ग. मला निदान बी. ए. होऊ दे...

आई– प्रभा दुःख काय कोणास दाखवायची गोष्ट आहे? बाई, आपलं आपल्याजवळ ठेवावं. अति झालं तर या वाड्यात खूप अंधाऱ्या खोल्या आहेत. त्यात गुपचूप डोळे गाळावे... देशपांडयांच्या साऱ्या बायकांनी हेच केलं. स्वातंत्र्य नसल्यामुळे अगतिक झालेल्या देशपांडे यांच्या घराण्यातील स्त्रियांना अश्रू गाळण्याशिवाय काहीच पर्याय नव्हता याचे दर्शन घडविणारे हे बोलके चित्र या संवादाच्या माध्यमातून नाटककारानी घडविले आहे.

वहिनी– (भारावलेल्या स्वरात) खरं सांगू? असं वाटतं, हे सोनं नाही नुसतं; खूप काही आहे आणखी. वाटतं देशपांडयांच्या घरातल्या सगळ्या बायका उभ्या आहेत माझ्या अवतीभवती कौतुकाने पहात. दादीच्या सासूबाई, दादी, आई–सगळ्यांच्या मायेचा स्पर्श आपल्याला लागून राह्यला असं वाटते. किती जणांनी हे घातलं, जतन केलं. कोणा कोणाचे हात, गळे, ह्यांना लागले असतील. उद्या माझ्या परागची बायको ही घालेल. तिला असाच जाणवेल माझा स्पर्श. लग्नानंतर प्रथम मी आली या घरात तर आई कशा तेजस्वी लखलख दिसत होत्या. एकेक दागिना घेऊन सांगत होत्या. कोणाचा, केव्हा केला. ह्या सर्वांच्या रांगेतला मी एक भाग्यवान दुवा बरं! (प्रदीर्घ शांतता)

भास्कर – तुझी तर तंद्रीच लागली!

(वहिनी प्रदीर्घ निःश्वास टाकतात. शांतपणे एकेक अलंकार उतरवून डब्यात नीट ठेवतात. डबा बंद करून भास्करला देतात.)



वहिनी– देवाजवळ नेऊन ठेवा. (भास्कर अवाक) अन् ज्याचं त्यास प्रथम देऊन टाका...

किती भावपूर्ण संवाद आहे हा! वहिनींना संपूर्ण दागिने घातल्यावर भास्करप्रमाणे त्या दागिन्यांचा मोह होईल असे प्रथम दर्शनी वाटते. परंतु असे होत नाही. दागिन्यांच्या स्पर्शाने त्या गतकाळात हरवतात. केवळ मूल्यवान वस्तू म्हणून त्यांना दागिने घातल्याने आनंद होत नसेल पिढ्यानुपिढया चालत आलेल्या त्या दागिन्यांभोवती त्यांच्या सुखद भावना गुरफटलेल्या आहेत. त्यांच्या मनात मायेचा ओलावा निर्माण होतो. या संवादात कोठेही अलंकरण नाही. सहज बोलावे तसे हे संवाद आहेत. या संवादांना संभाषणाची पातळी लाभली आहे. म्हणून ते वास्तव वाटतात तसेच ते समजण्यास सोपेही होतात.

तात्याजींच्या घरात नेहमी राहणाऱ्या व्यक्तींची भाषा खास वऱ्हाडी आहे. त्यातही मुंबईला राहणारे सुधीर व अंजली आणि तात्याजींजवळ राहणारी हुशार व शिकलेली प्रभा ही प्रमाण मराठी भाषा बोलते. भास्करच्या तोंडी शिव्या देखील भरपूर आहे. आई, वहिनी यांच्या तोंडी 'पाप' 'पिडा' हे शब्द वारंवार येतात. एकूण भाषा अलंकार परंपरा टिकवू पाहणारी परंतु बदलत्या परिस्थितीचा स्वीकार करण्याचा लवचिकपणा अंगी असलेली, संकट समय देखील शांत राहणारी व सर्वांना एका प्रेमाच्या धाग्याने एकत्र बांधणारी आई व तिच्या पार्श्वभूमीवर बाह्यतः दुरावा निर्माण झालेले परंतु प्रेमाचा जिव्हाळा असल्याने तुटू न शकणारी भावंडे यांचे सुंदर व भावपूर्ण दर्शन घडविल्याने हे नाटक म्हणजे आपलाच कौटुंबिक जीवनपट आपण पाहत आहोत असे वाटते.

महेश एलकुंचवार यांचे 'आत्मकथा' हे दुसरे नाटक या या एकांकिकेमधून रंगमंचावर सादरीकरणाच्या बाबत नाविन्य आणले आहे. एकांकिकेचे तीन विभाग पाडून त्यात एकेक दृश्य दाखविले आहे. याच्या कथानकाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास एका माननीय लेखकाची ही आत्मकथा आहे. त्याचे जीवनात पूर्वी दोन स्त्रिया येऊन गेल्या. त्याच्या साहित्याचा अभ्यास करून पीएच.डी. मिळविणारी एक तरुणी त्याच्या जीवनात येऊ घातलेली आहे. त्यांनी लिहिलेली कादंबरी, त्यातील पात्रे घटना लेखकाच्या प्रत्यक्ष जीवनात घडले असून साहित्यकृती करिता काही बदल त्यात केले आहेत. कादंबरीतील पात्रे लेखकाशी



Arts & Science College 160

बोलतात. वासंती आणि उत्तरा या प्रत्यक्ष लेखकाच्या जीवनात आलेल्या स्त्रियांशी तुलना करतात. ही कल्पना नाटकापेक्षा एखाद्या चित्रपटात शोभावी अशी आहे.

वातावरण निर्मिती सादरीकरणाचाही वाटा मोठा आहे. रंगमंचाचे तीन विभाग पाडले आहे. अ ब क प्रकाश योजनेच्या माध्यमातून प्रत्यक्ष संवाद चालला असेल तेवढाच भाग दाखवायचा. एखाद्या चित्रपटाप्रमाणे फोन करणारी व दुसरीकडून फोन घेणारी दोन्ही व्यक्ती एकाच वेळी रंगमंचावर प्रेक्षक पाहू शकतात. राजाध्यक्षांची पत्नी उत्तरा, तिची बहीण वासंती व स्वतः राजाध्यक्ष या तीन पात्रांवर कथानक आधारलेले असून त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध, त्यातून निर्माण झालेले तणाव, उत्तरेला मूल नसण्याचे कारण म्हणजे तिच्यातील नैसर्गिक दोष. हे कळल्यामुळे तिच्यावर झालेला मानसिक आघात, तरी देखील उतरत्या वयात 'तुम्हाला मुलाचा आधार आहे' हे राजाध्यक्ष यांना कळविण्याची धडपड यामुळे स्वतःच्या नवऱ्याशी पटत नसले, त्याच्यातील दोषाची जाणीव असली तरी शेवटपर्यंत त्याला मानसिक सुख देण्याची धडपड करणाऱ्या भारतीय स्त्रीचे दर्शन मउत्तरांफ या पात्रामध्ये घडते.

संवाद रचनेकडे पाहिले असता लहान लहान वाक्यातून घटना व प्रसंग याचे चित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे. नायक राजाध्यक्ष, पत्नी उत्तरा व तिची बहीण वासंती या तिघांचेही कौटुंबिक जीवन सुखा समाधानाचे नाही. शेवटी तिघेही एकमेकांपासून दूर गेलेले व एकाकी दाखविले आहे. वासंती चा मुलगा दिली हा तिचा नवरा देवदत्त याचा मुलगा नसून राजाध्यक्षांचा आहे. ही बातमी उत्तरे इतकी प्रेक्षकांनाही धक्का देणारी आहे. उत्तरा आणि वासंती यांचा संवाद नाटकारानी खूप परिणामकारक केला आहे.

उत्तरा– मी वेगळे राहिले. पण मानानं. जग मला त्यांची बायको म्हणून ओळखतं. माझी प्रतिष्ठा गेली नाही की कोणी बोट उचलून दाखविला नाही कधी! माझ्याकडे त्यांनी आपण मला काही दिलं नसेल, पण माझ्या हक्काचा वाटा मी उचलून आणला. तुला मात्र बदनामी शिवाय काही दिलं नाही त्यांनी. उघड्यावर पडलीस.

वासंती– नाही ताई.



उत्तरा– काय दिलं त्यांनी तुला? (विराम)

वासंती–(डोळे उचलून स्थिरपणे उत्तरे कडे पाहते. ती खरे सांगत आहे की खोटे, हे कळत नाही) दिलीप.

(उत्तरेवर जणू वज्राघात झालाय) दिलीप त्यांचा मुलगा आहे.(उत्तरेच्या तोंडून विध्द जनावरासारखा चित्कार निघतो.)

उत्तरा–खोटं बोलतेस नं?(वासंती नकारार्थी मान हलविते.) मला दुखवण्यासाठी? माझ्यावरचा आकस अजून गेला नाही वसू? थकलेय मी. खोटं आहे नं हे?

वासंती– नाही ताई.

उत्तरा– तू देवदत्तांना फसवलंस?

वासंती– देवदत्तांना माहीत होतं. दिलीप अनंतरावांचा आहे म्हणून...

उत्तरा– खोटं...

वासंती– खरं आहे ते ताई...

उत्तरा– तुला चोरून भेटत होते हे?

वासंती– ते देवदत्तांकडे यायचे. माझ्याशी बोलायचे देखील नाहीत. पूर्ण दुर्लक्ष करायचे मला ते सहन झालं नाही. अपमान वाटला. पराभव वाटला. म्हणून एकदाच फक्त एकदाच. ताई, माझी शक्ती अजमावून पहायची होती मला. त्याची खात्री पटल्यावर पुन्हा मी कधी त्यांच्याकडे पाहलं नाही.

उत्तरा– त्यांना माहित आहे?

वासंती– नाही.

उत्तरा– वासंती...

वासंती– त्यांना हे सांगून मला माझ्या आयुष्याचा सूत्र त्यांच्या हाती अडकवायचं नव्हतं. (उत्तरेच्या काळजाच्या ठिकऱ्या उडालेल्या आहेत. त्या गोळा करीत ती धडपडत उठते. फोनची डायल फिरवू लागतात. एकमेकांचे फोन्स एंगेज लागतात. दोघांची अस्वस्थता वाढत जाते. अखेर दोघी एकाच वेळी फोन खाली ठेवतात. आपापल्या जागी परत जातात.)(वासंती उत्तरेकडे टक लावून पहात आहे.

उत्तरा– आपल्याला कुणाला कधी सुखाचा चेहरा दिसला नाही. आता त्यांना तरी दिसू दे तो आयुष्याच्या उतरणीला (विराम) कोणी मध्ये हात घालून खेळाचे हे चक्र थांबवलं पाहिजे वसु...

या छोट्याशा व अगदी व्यवहारी संवादातून कितीतरी गोष्टी साध्य झाल्या आहे. वासंती चा मुलगा दिली राजाध्यक्षांचा म्हणजे आपल्या पतीचा मुलगा आहे. या बातमीने उत्तरेच्या हृदयावर आघात होतो. त्याचवेळी आपल्याला आयुष्यभर छळणारी, मूल नसल्याची जाणीव यामध्ये आपल्या पतीचा दोष नसून उणीव आपल्यातच आहे. ही एक धक्का देणारी गोष्ट पण हे आघात होत असताना त्याचा विचार क्षणभर बाजूला ठेवून, ही बातमी राज्याध्यक्षांना म्हणजे स्वतःच्या पतीला कळविण्याची धडपड. निदान आयुष्याच्या उतरणीला तरी आपल्या पतीला सुखाचे दिवस दिसावे, अशी इच्छा तिच्या पतीवरील प्रेमातून उद्भवते. त्या क्षणी ती आपले दुःख बाजूला ठेवते. ती स्वतंत्र रहात असूनही पतीच्या सुखासाठी धडपडते. ही भारतीय स्त्री परंपरेला शोभणारी गोष्ट आहे.

या नाटकातील संवादाची भाषा अतिशय साधी, अल्प अक्षरी, अर्थपूर्ण असून त्यातून भावदर्शन घडते व परिणामकारकता वाटते.

## नाटकाचे स्वरूप–

जयवंत दळवी यांच्या नाट्यकृतीकडे दृष्टिक्षेप टाकल्यास सर्वप्रथम लक्ष जाते ते त्यातील विषयाकडे. प्रामुख्याने त्यांच्या नाट्यकृती कोणत्या ना कोणत्या लैंगिक व मानसिक विकृतीवर आधारलेल्या आहेत तसेच त्या सामाजिक आणि राजकीय जाणीव देखील आढळतात. सामाजिक समस्यांच्या सोडवणुकीसाठी अनेकदा हिंसाचाराचा मार्ग पत्करताना व उपयोग करताना आढळतात.

## संवादाचे स्वरूप–

या ठिकाणी संवादाच्या अनुषंगाने विचार करताना जयवंत दळवींची 'बॅरिस्टर' आणि 'पुरुष' ही दोन नाटके विचारात घेतली आहे. 'बॅरिस्टर' हे नाटक १९७७ या काळातील आहे. बाल विधवांच्या भावनांचा होणारा कोण मारा आणि त्याची भीषणता यामध्ये दाखविली आहे. वैवाहिक सुखाशिवाय जीवन अपूर्ण आहे, हे बाल विधवा मावशीबाई, रावसाहेब, नानासाहेब इ. व्यक्तीरेखांच्या मधून व त्यांच्या विरोधात राधाक्का व भाऊसाहेब यांच्या सुखी



संसारात स्पष्ट केले आहे. रावसाहेबांचे व्यक्तीचित्र अनेक रंगांचे मिश्रण आहे. त्यातील सर्व रंग एकमेकात मिसळलेले आहे. त्यांनी दमयंती गोरेशी लग्न ठरवून केले नाही. विलायतेत ग्लोरीयाशी ते मैत्री करतात, परंतु प्रत्यक्षात तसे घडत नाही यावरून केशवपणाची रुढी कितीही घातक असली व विधवांचा सामाजिक दर्जा एकदम कनिष्ठ नको हे मान्य असले, तरी परदेशातील वातावरणात राहून स्वतःला सुधारक म्हणणारे रावसाहेबांसारखे लोक देखील विधवांशी विवाह करण्याची प्रत्यक्षात हिंमत करीत नाही. दुसऱ्याला सामाजिक सुधारणा करावयास सांगणे अथवा स्वतः सुधारणा अंशतः मान्य करणारे लोक स्वतःला किती सुधारणावादी म्हणत असले तरी तशी कृती केल्याशिवाय व त्या कृतीतून निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितीशी लढा दिल्याशिवाय ते स्वतः सुधारक होऊ शकत नाही. परंतु राधा का प्रमाणे असते दमयंती गोरे व ग्लोरीयाशीही लग्न करत नाही.

भाऊसाहेब व राधाक्का यांचा तृप्त व सुखी संसार तसेच कामगंडाची भावना असणारे बॅरिस्टर, मातृत्वाची इच्छा अपूर्ण राहिलेल्या बाल विधवा विकेशा मावशी बाई आणि मनोरुग्ण असलेले थोरले बंधू नानासाहेब यांच्या जीवनात काहीना काही कमतरता, अपुरेपणा, दुःख असलेल्या व्यक्तिरेखा रंगवून नाटककार आणि उठावदार चित्र निर्माण केले आहे. प्रत्येकाची विचारसरणी त्याच्या वाट्याला आलेल्या जीवनाशी सुसंगत आहे. काहीसे दुष्ट व स्वार्थी असे राधा काचे जबरदस्तीने केशव पण करायला लावणारे भाऊरावचे वडील अशा व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या मनावर ठसा उमटवून जातात.

नाटकाची भाषा साधी आहे परंतु परिणामकारक आहे. संवाद रचनेचे कौशल्य त्यात आढळते हे हे खालील संवाद पाहिले असता पटते.

मावशी– राधाक्का ए... राधाक्का...

राधाक्का– (आपल्या खोलीतून बाहेर येत) काय हो? या ना, या... बसा.

मावशी– काय करीत होतीस?

राधाक्का– काही नाही, झोपत होते.

मावशी– झोपला का?

राधाक्का– झोपला..

Arts & Science College 100 *K

मावशी– (हसत) भारी, बाई लबाड हो पंपू सेठ... पक्का मस्तवाल आहे.

राधाक्का– काय झालं?

मावशी– जरा पदराखाली घेतला... म्हटलं असेल... पण कसला हो? दोनदा बरं चुरू चुरू ओढलं मग काही येत नाही बघून सोडून दिलं... (हसते)... पण तेवढ्यांना सुद्धा खूप बरं वाटलं ग बाई...

राधाक्का– बसा ना...

या संवादातील प्रश्नोत्तरे अगदी घरगुती असून ते प्रश्न अगदी सरळ साधे आहे. कोणताही जड शब्द नाही. परंतु विकेशा आणि बालविधवा असलेल्या मावशी बाईची रूढी खाली चिरडल्यामुळे मातृत्वाची इच्छा अपूर्ण राहिली हे या कृतीतून दिसते.

नाट्यकातील संवादाची भाषा साधी, सुटसुटीत, स्वाभाविक नेमके अर्थाकडे लक्ष देणारी परिणामकारक आहे.

## नाटकाचे स्वरूप–

'पुरुष' हे जयवंत दळवी यांचे दोन अंकी स्वतंत्र सामाजिक नाटक आहे. या नाटकामध्ये सामाजिक प्रश्न हाताळण्याचा प्रयत्न नाटककारानी आणि केला आहे. काही महत्त्वाची पात्रे उत्तम रंगविली आहे. गुलाबराव सारखे लोक पैसा व सत्ता यांच्या सहाय्याने दुष्कृत्ते करून ती दडपून टाकतात. आणि त्याचा प्रतिकार करण्याची व तोतडीस नेण्याची हिंमत खूप कमी वेळा आढळते. पण तसा प्रयत्न अंबिकेने अनपेक्षितपणे व निर्घृणपणे केला. वरिष्ठ व कनिष्ठ जातीतील आंतरजातीय विवाहाच्या साफल्याचा प्रश्न उपस्थित केला आहे. सिद्धार्थ दलितांच्या अन्यायाच्या विरोधात झगडणारा नसून, तो फक्त स्वतःवरील अन्यायाविरुद्ध झगडतो इतकेच काय तर अंबिकेवर बलात्कार झाल्यावर तिच्याशी लग्न करण्याचे तर टाळतोच पण तिच्यावरील अन्यायाविरुद्ध लढण्याचे ही टाळतो.

अण्णा हे पात्र सत्य व अहिंसा यांची पूजा करणारे आहेत. पण दुर्बळ आहेत. उत्तम शिक्षक म्हणून ते राष्ट्रीय पारितोषिक विजेते आहे. त्यांची मुलगी अंबिका स्वाभिमानी बाणेदार धडाडीची पुरुषांची गुलामगिरी न पत्करणारी



आहे. दलितांवरील अन्याय दूर करण्यासाठी सतत जगणाऱ्या एका दलित मुलाशी लग्न करू इच्छिते. पण तिच्यावर गुलाबरावने बलात्कार केल्यावर तो सिद्धांतला अन्याय वाटत नाही. या नाटकाची भाषा साधी असून संवाद सुटसुटीत व परिणामकारक आहे.

तारा–(थंडपणे) ही मुंगी कोण?

अण्णा–(वैतागून) मुंगी, म्हणजे कोण? आडनावाचा मुंगी नव्हे. मुंगी म्हणजे... 'मुंगी साखरेचा रवा' मधली मुंगी....(दोन्ही हात जोडून) आता आणखी, साखर आणि रवा कुठे आहे. म्हणून विचारू नकोस (मधूला उद्देशुन) हिच हे असं आहे. (अण्णा नारळ मधुकडे देतात. मधू तो नारळ ताराबाई कडे देते. ताराबाई कानाजवळ नारळ वाजवून पाहतात)

अण्णा–हे काय?

तारा–काही नाही... नारळ आहे तिसरी फळ आहे, हे वाजवून पाहिलं.

अण्णा–म्हणजे?

तारा–काही नाही. शालीबरोबरच श्रीफळ कधी वाजत नाही... पाणी नसतं...

अण्णा– (वैतागून) हिच असं आहे. सगळ्या सत्कारावर पाणी... असू दे... पण तुला सांगतो, मधू... अशी प्रचंड सभा झाली...

तारा– दैवज्ञ ब्राह्मण समाजाचा हॉल... पोरांच्या मुंजी करायची जागा... हो... शे पाऊणशे माणूस म्हणजे डोक्यावरून पाणी (एकदम प्रश्न विचारते) चित्रे बाई आली होती?

अण्णा– म्हणजे काय? त्यांनी सुद्धा माझ्या गौरवाचे भाषण केलं...

तारा– (थंडपणे) तुम्हाला दिलं काय?

अण्णा–(खांद्यावरची शान देत) ही शाल दिली. काश्मिरी आहे...

तारा– (शाल बघत) पाण्यात भिजवाल, तेव्हा त्या दुसरे कपडे भिजवू नका. दुसऱ्या बऱ्या कपड्यांना रंग लागणार... (मधुला) या सत्कार आतल्या शालीचं एक असतं... शालीचा रंग कच्चा. पण तो दुसऱ्या कपड्यांना लागला की पक्का...

अण्णा–काश्मिरी शाल आहे.

तारा–(लेबल दाखवित) चिठ्ठी काढायला विसरले... तेवीस रुपये पन्नास पैसे?

Principal
Arts & Sci. College
Kurha

2022-23

# साहित्य : समाज आणि प्रसार माध्यमे



संपादक

डॉ. प्रतिभा एस. जाधव

Arts & Science College 160 * KURHA *

# चि. त्र्यं खानोलकर यांच्या सगेसोयरे व अवध्य या नात्याकृतींचा चिकित्सक अभ्यास

डॉ. निशा सु. जोशी
मराठी विभाग प्रमुख कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा
मो. नं ९४२२०३६९३१

---

**प्रस्तावना-** नाटक हा साहित्यप्रकार आपल्या भारतामध्ये अगदी प्राचीन काळापासून रूढ आहे. इंग्रजांच्या राजकीय सत्तेमुळे पाश्चिमात्य संस्कृतीचा परिचय झाला. पाश्चात्य साहित्याच्या अभ्यासाने साहित्याच्या क्षेत्रात नवे वारे वाहू लागले. परिणामी भारतीय साहित्याचा अभ्यास करताना पाश्चात्य वाङ्मयाचा अभ्यास करणे अपरिहार्य ठरले. भारतामध्ये निरनिराळ्या स्वरूपात नाट्यकला अस्तित्वात होती. कळसुत्री बाहुल्या, भारुडे, गोंधळ, ललिते, दशावतारी खेळ, तमाशा इत्यादी स्वरूपात लोकसंस्कृतीचा आविष्कार होत होता.

नाटकाची कथा ज्या परीघाभोवती फिरते त्या सर्व प्रकारच्या संघर्षाची अभिव्यक्ती ही परस्परांशी बोलण्यातून संभाषणातून होत असते."संवादाला नाटकाचा आत्माच म्हटले पाहिजे, कारण आत्म्याप्रमाणे तो सर्वव्यापी आहे. कथानक विकास, स्वभाव परिपोष, नाटकातील काव्य किंवा तत्त्वज्ञान संवादातूनच व्यक्त होते"१

खानोलकरांच्या नाटकाचा विचार करता त्यांच्या नाटकांमधून निसर्ग आणि माणूस, पार्थिव आणि अपार्थिव, . तात्कालिक आणि सार्वकालिक सत्तामधील संघर्षाच्या नाटकीय रूपांची मांडणी केलेली आहे. या ठिकाणी खानोलकरांच्या अनेक नाटकांमध्ये सगेसोयरे आणि अवध्य या दोन नाटकांचा इथे विचार केला आहे. या नाटकांमधून कोणती नाट्यसूत्रे आणि आशयसूत्रे साकारली आहे याचा विचार या ठिकाणी केला जाणार आहे.



Arts & Science College 160 * KURHA *

खानोलकर यांच्या अनेक नाटकांमध्ये मानवी नातेसंबंध, या नातेसंबंधातील गुंतागुंत, यशापयश, अर्थपूर्णता व अर्थनिरास, सुखदुःखे यांचा नाट्यपूर्ण असा चिंतनाचा आविष्कार साकार होताना दिसतो. हे मानवी नातेसंबंधाच्या सर्जनाचे आणि विनाशाचे तत्व त्यांच्या नाटकांमधून शब्दांकित होते.

त्यांच्या परस्परांतील संबंधात परस्परांविषयीचे प्रेम, आस्था हे घटक जसे अंतर्भूत असतात तशी परस्परांविषयीची कर्तव्यही समाविष्ट असतात. प्रेमाकरता आणि कर्तव्यांच्या पूर्तीसाठी होणारी हेतूपूर्ण कृती यातून कौटुंबिक नाती दृढ होत जातात. व्यक्तिगत सुख आणि स्वार्थ यांच्या परिपूर्तीच्या आड एखादी गोष्ट येऊ लागली की कौटुंबिक नातेसंबंध पुरावा येऊ लागतो. संघर्षाला जन्म देतो. या नात्याअंतर्गत संघर्षातून मानवी नातेसंबंधातील खोटेपणा, मानवी संबंधाला येणारे वस्तू आणि माणसाच्या ठाई बसणारे अतिरेकी आत्मप्रेम खानोलकरांच्या नाटकाचे आशय सूत्र ठरते.

खानोलकरांची नाटके सर्वसाधारणपणे मानवाच्या जगण्यात ज्या मूल्यांचा ऱ्हास होत आहे आणि त्यामुळे ज्या प्रकारची परिस्थिती निर्माण होत आहे, त्याकडे त्यांचे नाटक प्रेक्षकांचे लक्षवेध वेधते.

**सगेसोयरे घटना प्रसंग विशेष**-काही नाटकात असणाऱ्या घटना प्रसंगाने ते नाटक पुढे जात असते. खानोलकरांच्या नाटकांमध्ये घटना प्रसंगाची सहेतुक मांडणी आढळते. जीवनदृष्टी दिसून येते. शब्दरूप देताना घटना प्रसंगाची अर्थपूर्ण आणि नाट्यपूर्ण मांडणी करताना नाटककाराच्या मनात कथानकाच्या संदर्भात जी जाणीव असते तिचा प्रत्यय येतो. घटना प्रसंग हे नाटकाचे आत्म घटक असते असे म्हटल्यास अतिशय होणार नाही. वरवर अत्यंत साध्या भासणाऱ्या, वाटणाऱ्या घटना प्रसंगाची नाट्यगत वास्तवात निर्मिती करून नाटककार त्या माध्यमातून लक्षवेधी अशा जीवनानुभावाकडे प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत असतो, विचार करायला प्रवृत्त करीत असतो. साध्या वाटणाऱ्या घटना प्रसंगाच्या मालिकेतूनच खानोलकर त्यांचे जीवन आकलन आणि जीवन भाष्य मांडताना. 'सगेसोयरे' या



Arts & Science C 160 KURNA

नाटकातील घटना प्रसंगाचा विचार करता, असे सारे घटना प्रसंग या नाटकाचे नाट्यात्म विधान अधोरेखित करणारे आहे. नरहरी आणि मीरा यांच्या घरात एका रात्री होणारा देशमुख या पात्राचा प्रवेश ही या नाटकातील प्रमुख घटना किंवा मध्यवर्ती संकल्पना आहे. ही पात्रे परस्परांना अपरिचित असणारे जेव्हा एकमेकांच्या समोर येतात तेव्हा नाटकांमध्ये तणावाचे वातावरण निर्माण होते. तणावातूनच अनेक प्रसंगांची निर्मिती झालेली आहे. परस्परांना परिचित असणारे नरहरी आणि मीरा यांचे जीवन दर्शन होते. माणसाचे मनोगत वास्तव, त्यांची दुःखे, त्यांचे मानसिक खुजेपण, बोथटलेले माणूसपण आणि आत्मकेंद्री जगणे रंगमंचावर अनेक घटनांमधून प्रसंगांमधून या नाटकातून साकार होते. मुख्य घटनेतून अनेक गौण घटना प्रसंग उदयाला येतात. अशा घटना त्यांच्या नाटकाला सौंदर्यात्मक रूप प्राप्त करून देतात.

**नाटकाचा आशय व विषय -**या नाटकाच्या विषयाचा विचार करता असे दिसते की आशय फार व्यापक आहे. माणूस सुखात स्वस्त चित्त असतो, तो ज्या जमिनीवर उभा आहे ती घट्ट, बळकट आहे तोपर्यंत. तो आधारच नाहीसा झाला, जमीन सरकली तर त्याचे रूप पालटते त्याची आंतरिक कुरूपता बाहेर येते. या नाटकातील नरहरी व मिरा हे सुखी जोडपं व त्यांचे शेजारी यांचे बुरखे गळून पडतात हे नाटककार खानोलकर यांना शब्दचित्रित करावयाचे आहे.

नरहरी कोणत्या संकटाची जबाबदारी घेत नाही. समुद्रात वादळाने बुडालेल्या कुटुंबाचे प्रमुख देशमुख एकटेच वाचतात. त्यांना हार्ट अटॅक येण्याची शक्यता वाटतात नरहरी त्यांना त्यांची विनंती मान्य न करता बाहेर घालवतो. त्यांचा मित्र बापू फ्रॉड केल्याने त्याला पैशांची गरज असते. त्याला तो पैसे देण्याचे नाकारतो. देशमुखांना बाहेंर पाठविल्यावर शेजारचे हरिभाऊ नरहरीकडे येतात व त्यांचे हार्ट फेल होते. या घटनेस नरहरीची पत्नी मिराच कांरणीभूत आहे असे नरहरी म्हणतो. त्यामुळे मीरा दुःखी होते. देशमुख, फ्रॉड केलेला नरहरीचा मित्र बापू, देशमुख यांची मुलगी या सर्वांना मदत करण्यास व आश्रय



Arts & Science College 160 *KURHA*

देण्यास मीरा तयार असते. पण तिला मूल नसल्याने व तिला तिच्या घरात योग्य ते स्थान नसल्याची जाणीव झाल्याने ती अतिशय दुःखी होते. तिला केवळ रात्रीच्या आश्रयाकरिता समुद्र एवढं दुःख घेऊन आलेले देशमुख व त्यांची मुलगी जवळचे वाटतात. त्यांच्या अंगावर मायेने, कर्तव्य म्हणून शाल घालते. शेवटी देशमुख यमुसह नरहरी मीरा यांना एकत्र राहू द्या अशी विनंती करतात. एकाकी झालेल्या देशमुख यांच्या अंगावर मीराने पांघरून घातलेली शाल घेऊन सकाळी ते यमुसह जायला निघतात. तेव्हा आपल्यावरही माया करणारे कुणीतरी आहे या कल्पनेने मीराने घातलेले पांघरून फक्त ते घेतात आणि 50 हजार रुपये असलेली बॅग मात्र तेथेच ठेवतात. गेल्यावर मीराच्या मनात जे विचार येतात ते एक प्रकारे नाटकाचा आशय सांगणारे आहे.

मीरा -एक माणूस आला होता. या चिटुकल्या घरात सर्व समुद्राच्या स्वाधीन करून एक समुद्रा एवढे दुःख घेऊन आला होता...... वादळी वेडा न पछाडलेला तो माणूस तिथे उभा होता.... माझ्या पदराच्या टोकांना त्या माणसाचे अश्रू पुसायला धावले. ते अश्रू म्हणजे काय एखाद्या सुखवस्तू प्राजक्ताच्या फुलाचा सडा नव्हता.... होत्या त्या फक्त ठिणग्या. भाजून निघाले मी पुरती. माझ्या विझलेल्या जोडीदाराच्या नावाचं कुंकू या कपाळावर, या घरावर, इथल्या प्रत्येक गोष्टीवर सत्ता आहे ती त्याची मी कोण? मी कुठली? यात माझा काय संबंध आहे? मृगजळासारखं राहायचं मी इथं. मी हाडामासाची नाहीच आहे मुळी. हे घर कुणाचा आहे कुणाला माहित...... माझ्या बाळासाठी राहणार आहे मी इथं. बाळा, तुझ्या डोळयात समुद्रा एवढं दुःख पाहिलं रे मी. ते घेऊन एक माणूस आला होता. एक माणूस इथे येणार आहे. आपल्या बाळ मुठीत एक दिलदार आयुष्य घेऊन एक माणूस इथे येणार आहे. तुझ्या पायात वेड्या नसतील. आशा आहे. तुझ्या पायात तर वेड्या नसतील ...[२]

**अवध्य-** या नाटकाच्या केंद्रस्थानी गंगाधर हे पात्र आहे. प्रख्यात कादंबरीकार असणाऱ्या या पात्राला आपल्या आगामी कादंबरीतून जगाचे असुंदर, भयाभह



Arts & Science College
160
KURHA

आणि विरुप दर्शन घडवायचे आहे. आपला हा हेतू तो स्वतःच नाट्याच्या ओघात कथन करतो. त्याचे निर्मितीशील मन त्याच्या कथित कादंबरीतील संभाव्य अनुरूप पात्रांचा शोध घेत आहे. त्याच्या या पात्रशोधाची जाणीव रंगावकाशात घडणाऱ्या काही घटनापटा मधून वाचक प्रेक्षकांना होते. गंगाधर हे एक दुभंगलेले व्यक्तित्व आहे. मरण प्रेरणा आणि जीवन प्रेरणा यांच्या आंतरिक द्वंद्वात सापडलेल्या या पात्राची निर्मितीप्रेरणाही या द्वंद्वात सापडलेली आहे. त्याची ही द्वंद्वमूलता रंगावकाशात अनेक प्रसंगांना जन्म देते. त्याचे मनोगत प्रेरणाव्दंव्द आणि त्यातून उदयाला येणाऱ्या त्याच्या कृती उक्ती या स्वभावतःच परस्पर विरोधी, परस्परछेदक आणि परस्परविसंवादी स्वरूपाच्या आहे. त्यामुळे त्यांचा आविष्कार करणारे नाटकातील प्रसंग अत्यंत तीव्र, आघाती स्वरूपाचे आहे तर कधी अतिशय कोमल स्वरूपाचे आहे. संपूर्ण नाटक आणि त्यातील प्रधान व गौण घटना प्रसंगाचे मूळ गंगाधरच्या मनोगत प्रेरणाव्दंव्दाशी संबंधित असल्याचे दिसते. त्यामुळे संपूर्ण रचनेला एक जटिलता, संमिश्रता, गुढता व धुसरता प्राप्त झाली आहे.

नाट्यगत प्रत्यक्ष काल, गंगाधरचा मनोगतकाल, त्याच्या स्वप्न आणि दिवा स्वप्नातील काल असे काळाचे संमिश्र पट रंगमंचावर घडणाऱ्या घटनांमधून साकार होते. अशा घटनांमध्येच कांचन, पंढरी, नीला या पात्रांना एक दुहेरीपण प्राप्त होते. ती नाटकातील पात्रे तर आहेतच. पण ती गंगाधरच्या कल्पित कादंबरीतील पात्रेही होतात. त्यांना गंगाधरच्या भूतकाळातील आणि त्याच्या स्वप्न पातळीवरील अनेक संदर्भही प्राप्त होतात. उदा. कांचनच्या संदर्भात त्याला 'सैना'चे स्मरण होते. आणि गंगाधरने तिच्याशी ती सैनाच आहे असे समजून वर्तन करणे. प्रस्तुत नाटकात गंगाधरच्या विशिष्ट वर्तन धर्मामुळे दारावरील बेल वाजणे, किंकाळीचा आवाज यांना घटना प्रसंगात महत्त्व प्राप्त होताना दिसते.

**नाटकाचा आशय व विषय** -प्रायोगिक रंगभूमीवर खानोलकरांचे हे नाटक खूप वादग्रस्त ठरले आहे. ज्या पात्रांवरती नाटक गुंफलेले आहे तो लेखक गंगाधर



Arts & Science College 160 KURHA

गायतोंडे हा वास्तवाची जाणीव तुटलेला, मनोविक्षिप्त असून त्याचे व्यक्तिमत्व दुभंगलेले आहे. दोन प्रवृत्तींचा एकमेकांशी व नाटकातील इतर पात्रांचा नाटकातील दोन वेगवेगळया भागातील पात्रांशी संवाद होतो. यातून वेगवेगळे नातेसंबंध उलगडतात. गंगाधर नाटक लिहायला हिल स्टेशनवर येतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या दोन भागातील एकाला वास्तवाचे भान आहे. दुसरा श्रेष्ठ आत्मा आहे. प्रत्यक्षात त्याचा एका धनगर स्त्रीशी संबंध येऊन ती गरोदर राहते पण तो तिचा स्वीकार करत नाही. या चुकीबद्दल त्याच्यातील श्रेष्ठ आत्मा त्याला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करतो. गंगाधरने पार्टिशनच्या छिद्रातून पाहिलेले दृश्य ही वास्तवता त्याच्या मनात डोकावल्यावर त्याला दिसलेली दृश्य त्यात पाशवीपणा, शृंगार व आत्महत्या ही स्वतःची वेगळी प्रतीक त्याला दिसतात. शेवटी त्याच्या सृजनशीलतेच्या दाहकतेतून नाट्यकृती जन्माला येण्याऐवजी त्याचाच विनाश होतो.

या नाटकाच्या उद्देशाबाबत विचार करता असे जाणवते ती जाणीवेतील व्यवहाराचं, वागणुकीचं नातं अबोध मनाच्या विचारांशी असतं. हेच नाटकाराला सांगायच आहे. गंगाधर मधील श्रेष्ठ आत्म्याने त्याच्यातील अहमला नष्ट केलं. पण माणसातील सर्जनशीलता कधीही नष्ट होऊ शकत नाही. म्हणून ती अवध्य आहे हा नाटकाचा आशय आहे.

या नाटकातील संवादाचे वैशिष्ट्य म्हणजे तो पात्र नाम विरहित आहे. गंगाधर मधील अहमचा त्याच्याच श्रेष्ठ आत्म्याशी झालेल्या संवादाचा एक नमुना या ठिकाणी पाहता येईल.

गंगाधर- मद्य हवंय आणि कांचन नावाची मादी दोघेही हवीत-(विष पुढे करून) हे सुद्धा!

गंगाधर-आता त्याची गरज नाही....... आता गरज असलीस तर फक्त याचीच

Arts & Science College ... KURHA 160

गंगाधर- मी निघालो, कांचन मिळाली तर ठीकच आहे, नाहीतर एखादी धंदेवाली रांड सुद्धा चालेल. पण या क्षणी कुणीतरी बाई हवी. भयंकर चक्र फिरतय मस्तकात वासनेचं- पेशी न पेशी उत्तेजित झाली पाहिजे यात सर्व आहे....

गंगाधर- मृत्यूहून याचं काय असणार वेगळं?

- तुला याहून वेगळं काहीच मिळणार नाही आहे. आज पुन्हा एकदा हजारो वर्षानंतर सैतानाचा वध करायचा आहे. इथं मरणारा आणि मारणारा एकच आहे. नीलू- तुझी हत्या मी पाहिली आहे-उघड्या डोळ्यांनी. जन्म पाहणं आणि मृत्यू पाहणं एकच वाटतंय. तुझा मृत्यू पाहताना मी विव्हळ झालो आहे. मी कुणी सामान्य असा मी आज माझ्याकडे हजारो वर्षांचे संस्कार जागृत करतोय. ते सामर्थ्य घेऊन आज उभा राहतोय. माझ्यातल्या सैतानाला शिक्षा सुनावतोय,नीलू-गंगाधर, तू दोषी आहेस, गुन्हेगार आहेस?

गंगाधर- धुत साला. मी फक्त लेखक आहे-मानवतावादी नव्हे. कुठलेच वाद मला मान्य नाहीत. मी लग्न संस्था मानत नाही. मातृत्व आणि पितृत्व हे दोन संबंध मला भयंकर लांच्छनास्पद वाटतात. जन्म देणं एखाद्या माणसाला हा सर्वात मोठा गुन्हा आहे. स्वतःच्या इंद्रियाची खाज शमून तुम्ही तिसऱ्या एकाला जन्म देऊन तुम्ही नरकात का खेचतात? मला फक्त हा क्षण मान्य आहे. या क्षणाच फळ चाखून मी बिया जाळून टाकतो. बस याहून मला काहीच मान्य नाही.

गंगाधर-पूर्वी मी खुशाल मेलो असतो, पण आता नाही. मी जिंकलो आहे. माझी फिलॉसॉफी जिंकली आहे. आता मला हवा भरपूर लोळण्यासाठी चिखल. मला हवा आहे वेश्यागमनी शृंगार.[३]

या नाटकातील विषय मांडण्याची पद्धत गोंधळात टाकणारी आहे. संहिता वाचून एकदम सर्व गोष्टींचा बोध होत नाही. हे मुख्यतः प्रयोगाच्या दृष्टीने लिहिलेले नाटक असल्याने कदाचित ध्वनि योजना, प्रकाश योजना



Arts & Science College
160
KURHA

यामुळे ते समजणे शक्य होत नसेल. गंगाधरच्या मनात माजलेल्या गोंधळाचे दर्शन होते व त्याचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन समजतो.

मनुष्याच्या अबोध मनातील जाणीवा उलगडून दाखविल्या असल्याने व प्रतिकांचा वापर केल्याने सर्व स्तरातील लोकांना याचे आकलन होणार नाही त्यामुळे त्यातील दृश्य पाहून रसनिर्मिती ऐवजी वासना चाळविल्या जाण्याची व श्रृंगार रस निर्माण होण्याची शक्यता अधिक असल्याचे दिसते.[४]

खानोलकरांची नाट्य प्रतिभा कधी परस्परांना संपूर्णपणे अपरिचित असणाऱ्या पात्र रूपांना समोरासमोर उभे करते. कधी दोन भिन्न स्वभाव धर्माच्या पात्र रूपांना योगायोगाने ती एकत्र आणते. तर कधी एकाच पात्र मनातील परस्पर विरोधी प्रेरणा रुपी स्तरांना परस्पर सन्मुख होण्यास भाग पाडते अशा मधून उद्भवणारे नाट्य साकारणारे घटना प्रसंग त्यांच्या नाटकातून वाचक प्रेक्षकास सतत सामोरे येत असतात. हे त्यांच्या अवध्य आणि सगेसोयरे या दोन्ही नाटकांमधून प्रत्ययास येते.

संदर्भ

१.नाट्य चर्चा, संपादक, ना. बा. गोडबोले व इतर पृष्ठ २४
२. सगेसोयरे अंक ३ पुष्ट ८१ -८२
३. अवध्य अंक २रा पृ.५७
४. मराठी नाटकातील संवाद बदलते रूप रंग, सुनिता सहस्त्रबुद्धे पृ. १९९

Principal
Arts & Sci. College
Kurha




# ग्राम सक्षमीकरणात ग्राम पंचायतीची भूमिका एक विश्लेषणात्मक अध्ययन

प्रा. डॉ. विभा प्रविण देशपांडे

Book
2022-23



इस पुस्तक के सर्वाधिक सुरक्षित हैं। प्रकाशक की लिखित अनुमति के बिना इस पुस्तक या इसके किसी भी अंश का किसी भी माध्यम से अथवा ज्ञान के संग्रहण एवं पुर्नप्रयोग की प्रणाली द्वारा, किसी भी रूप में, पुनरुत्पादित अथवा संचारित-प्रसारित नहीं किया जा सकता, इसे संक्षिप्त, परिवर्धित कर प्रकाशित करना कानूनी अपराध है।

ISBN : 978-93-83144-02-0

प्रथम संस्करण 2023

© लेखकाधीन

| | | |
|---|---|---|
| पुस्तक | : | ग्राम सक्षमीकरणात ग्राम पंचायतीची भूमिका एक विश्लेषणात्मक अध्ययन |
| लेखक | : | प्रा.डॉ. विभा प्रविण देशपांडे |
| प्रकाशक | : | शुभम् पब्लिकेशन<br>3ए/128, हंसपुरम्, कानपुर-208021 (उ.प्र.)<br>सम्पर्क : 09415731903, 09452971407<br>E-mail: shubhampublicationskanpur@gmail.com<br>Website : www.shubhampublications.com |
| मूल्य | : | ₹ 495/– |
| शब्द सज्जा | : | शिखा ग्राफिक्स, कानपुर-14 |
| मुद्रक | : | अनिका डिजिटल, कानपुर-14 |
| आवरण | : | शिवम् तिवारी, कानपुर-14 |
| जिल्द-सज्जा | : | तबारक अली, कानपुर-01 |

मातोश्री स्व.श्रीमती स्नेहलता वामनराव चौबे

स्व.श्रीमती प्रतिभा लक्ष्मणराव देशपांडे

यांना समर्पित




**प्रा. डॉ. विभा प्रविण देशपांडे**


1. महाविद्यालयाचे नाव कला व विज्ञान महाविद्यालय कु–हा.
2. मागील 27 वर्षापासून राज्यशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्यरत
3. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे राज्यशास्त्र, अभ्यास मंडळाच्या सदस्य दि.25 / 4 / 2023.
4. पीएचडी च्या मार्गदर्शिका, अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग व संशोधन पेपर प्रकाशित,


Sp शुभम् पब्लिकेशन

3A/128, हंसपुरम्, कानपुर - 208021 (उ०प्र०)

**Contact :** 09415731903, 9452971407

**E-mail :** shubhampublicationskanpur@gmail.com

**Website :** www.shubhampublications.com

ISBN 978-93-83144-02-0

9 789383 144020 >

₹495.00